पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/११/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१८/११/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.[illegible]. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
५. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे – सहा.आयुक्त, मा.इंगळे, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता, मा.उबाळे – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

---------

विषय क्र.२) मनपाच्या ४ व्यायाम शाळांकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेबाबत – मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेबाबत.

विषय क्र.४) महापालिकेचे प्रथम महापौर मा.श्री.ज्ञानेश्वर लांडगे यांच्या नावे महापौर चषक कुस्ती स्पर्धांचे आयोजन करणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धा आयोजित करणेबाबत – मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पवनानगर येथील बॅडमिंटन हॉलला नविन कार्पेट बसवून मिळणेबाबत – मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्र.क्र.६४ बोपखेल येथील सार्वजनिक व्यायामशाळेस व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत – मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) मनपाचे सर्व प्रेक्षागृहाचे स्थापत्य विषयक कामकाज उद्यान स्थापत्य यांचेकडे सोपविणेबाबत – मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) मनपाच्या सर्व प्रेक्षागृहातील कर्मचा-यांच्या बदल्या करणेस मान्यता देणेबाबत – मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०१

दिनांक - १८/११/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा. नितीन लांडगे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०४/कावि/९९/२०१५, दि.०४/११/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रस्तावात नमुद १ ते २६ व्यायामशाळांकरीता सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या व क्रीडा पर्यवेक्षक यांनी व अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे व्यायामशाळांकरीता विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेकामी येणा-या र.रु.४९,३४,८८६/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख चौतीस हजार आठशे शहाऐंशी फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदर व्यायामशाळा साहित्याची खरेदीची कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई निविदा नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०२

दिनांक - १८/११/२०१५

सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा. नितीन लांडगे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव –

मनपाच्या सिध्दार्थनगर व्यायाम शाळा, पिंपरी बॉक्सिंग हॉल व्यायाम शाळा, चोविसावाडी व्यायाम शाळा, साई शारदा महिला व्यायामशाळा कासारवाडी या ४ व्यायाम शाळांकरिता सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या व क्रीडा पर्यवेक्षक व अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे व्यायामशाळांकरीता व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९,५१,१७९/-(अक्षरी र.रु.नऊ लाख एक्कावन्न हजार एकशे एकोणऐंशी फक्त) इतका खर्च अपेक्षित असून खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ०३
दिनांक - १८/११/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक : मा. नितीन लांडगे अनुमोदक : मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७२३/२०१५, दि.१६/११/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असो. व पुणे जिल्हा सॉफ्टबॉल असो. यांचे मान्यतेने आणि युनायटेड फ्रेंडस स्पोटर्स अकॅडमी, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८ यांचे सहकार्याने वॉर्ड क्र.२८ मासूळकर कॉलनी येथील मनपा डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल, मासूळकर कॉलनी, पिंपरी ४११ ०१८ येथे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये महापौर चषक राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.८,२८,४००/- चे खर्चास मान्यता, ट्रॉफीज, सन्मानचिन्हे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर्स खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, मैदानावर पाणी फवारणी खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग फ क्षेत्रीय कार्यालय व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा विद्युत विभाग, फ क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च ररु.६,२८,४००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता व क्रीडा साहित्य खरेदी, नेट लावणे मजूरी व खेळाडू, पंच निवास व्यवस्था खर्च र.रु.१,९५,०००/- हा युनायटेड फ्रेंडस स्पोटर्स अकॅडमी, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८ यांचेकडून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ०४
दिनांक - १८/११/२०१५
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.संगीता पवार
संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पहिले महापौर मा.श्री.ज्ञानेश्वर पांडूरंग लांडगे यांचा यावर्षी अमृतमहात्सवी वाढदिवसाचे वर्ष असल्याने त्यांच्या सन्मानार्थ “ महापौर चषक कुस्ती स्पर्धा ” महापालिकेने आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ०५
दिनांक - १८/११/२०१५
सुचक : मा. संगीता पवार अनुमोदक : मा.नितीन लांडगे
संदर्भ : मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने माहे जानेवारी २०१६ मध्ये प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे महापौर चषक राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या

अंदाजे र.रु.१०,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – ०६

दिनांक - १८/११/२०१५

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पवनानगर येथील बॅडमिंटन हॉल येथे दररोज बॅडमिंटन खेळले जाते व तसेच मोफत प्रशिक्षण पुरवले जाते. येथील नागरिकांना या हॉलचा महत्वपूर्ण उपयोग होत आहे. तरी येथील कार्पेट गेले बरेच दिवस खराब झाले आहे तसेच बरेच ठिकाणी फाटले आहे. या ठिकाणी खेळणा-या खेळाडूंना तसेच प्रशिक्षण घेणा-या लहान मुलांना पाय अडकून दुर्घटना होऊन इजा अथवा जखम होण्याच्या घटना घडत आहेत. तरी वरील ठिकाणी नविन कार्पेट बसवून देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – ०७

दिनांक - १८/११/२०१५

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

बोपखेल गाव येथील शितळादेवी तरुण मंडळ, अध्यक्ष – लालाजी तुकाराम घुले व इतर तरुण सार्वजनिक व्यायामशाळेस व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत वारंवार मागणी करतात, तरी बोपखेल येथील सार्वजनिक व्यायामशाळेस व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस व सदर व्यायामशाळा साहित्य शितळादेवी तरुण मंडळ तर्फे अध्यक्ष – लालाजी तुकाराम घुले यांच्या ताब्यात देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०८

दिनांक - १८/११/२०१५

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव –

मनपाचे सर्व प्रेक्षागृहाचे स्थापत्य विषयक कामकाज उद्यान स्थापत्य यांचेकडे सोपविण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक – ०९

दिनांक - १८/११/२०१५

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव –

मनपाचे सर्व प्रेक्षागृहाकरीता प्रशासन विभागामार्फत बदल्या व नेमणुका केल्या जातात. सदर चार प्रेक्षागृहातील कर्मचा-यांच्या बदल्या संबंधित अधिकारी यांचे अधिकारात एका प्रेक्षागृहातून दुस-या प्रेक्षागृहात करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( मासुळकर समीर मोरेश्वर )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७८८/२०१५
दिनांक : १८/११/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.